**MMRDA receives 12 escalators, 2 elevators for Metro Line 7**

Mumbai

Even as the novel Coronavirus pandemic continues to wreak havoc across the world, the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) has begun its infrastructure project works on war-footing. Development work has commenced on the Mumbai Metro Line 7 (Dahisar East o Andheri East) as MMRDA received 12 escalators and two elevators in the last three days from China. The machinery came in as many as 30 containers and would be installed at three different stations of the Metro line. All the necessary precautions were taken of the shipment in the wake of COVID-19 outbreak.

Of the 12 escalators, four escalators each would be installed at Poisar (Mahindra & Mahindra), Magathane and Dindoshi (Pathanwadi) stations of Line 7 whereas the two elevators would be installed at the Akurli station. The authority has been doing all the installation and other construction work taking all relevant social distancing and sanitization measures.

The MMRDA has been initiating steps to curtail the onslaught of Coronavirus spread as it has started building a 1000-bed facility at its exhibition ground in Bandra Kurla Complex to cater to non-critical COVID-19 patients. The makeshift care centre would be made available within 15 days.

**मेट्रो 7 च्या कामाला आणखी गती- 12 सरकते जिने आणि 2 लिफ्ट दाखल**

मुंबई, प्रतिनिधी:

कोरोना विषाणूचा वाढता संसर्ग रोखण्यासाठी तिसऱ्यांदा लॉकडाऊनला मुदतवाढ देण्यात आली आहे. लॉकडाऊनच्या काळात मुंबईतील सर्व विकासकामे ठप्प झाली आहेत. पण आता मुंबईतील विकासकामे सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (एमएमआरडीए) मेट्रो प्रकल्पांच्या कामांना आता वेग आला आहे. कोरोनाचा प्रभाव नसलेल्या विभागात काम सुरू करण्यासाठी परवानगी मिळवण्याल्यानंतर प्राधिकरणाच्या हालचाली सुरू झाल्या. त्यानुसार मेट्रो 2 बी (डी. एन. नगर ते मंडाळे) तसंच मेट्रो 7 (दहिसर पूर्व-अंधेरी पूर्व ) या दोन्ही मार्गांचं काम प्राधान्याने सुरू करण्यात आलं आहे. यावेळी 23 किमी (उन्नत) अंतराच्या मेट्रो 2 बी मार्गावर गर्डरच्या कामाला सुरुवात केली आहे. तसेच गेल्या आठवडय़ात मेट्रो ७ मार्गिकेच्या चार स्थानकांसाठी 30 कंटेनरमधून १२ सरकते जिने आणि दोन लिफ्टची आयात करण्यात आली आहे . यावेळी या सामग्रीची सॅनिटायझर करण्यात आली असून सामग्री प्रत्यक्ष प्रकल्पस्थळावर दाखल झाली. दहिसर पूर्व-अंधेरी पूर्व या मेट्रो 7 मार्गावर विकासकामे सुरू झाली आहेत. यासाठी या मार्गवरील पोईसर , मागाठाणे , दिंडोशी या स्थानकांवर प्रत्येकी चार सरकते जिने, तर आकुर्ली स्थानकात दोन लिफ्ट दाखल झाले आहेत . तसेच विविध प्रकल्प स्थळी काम करणाऱ्या कामगारांची एमएमआरडीएमार्फत विशेष काळजी घेतली जात आहे. कामगारांची डॉक्टरांमार्फत वैद्यकीय तपासणी करून त्यांना आवश्यक सर्व गोष्टींचा पुरवठा केला जात आहे. त्यांची राहण्याचीही सोय करण्यात आली असून त्यांना स्वच्छतेचे धडेही दिले जात आहेत.याशिवाय,डीएन नगर ते मंडाले दरम्यानच्या मेट्रो-2 बी मार्गिकेवर गर्डरच्या कामालाही सुरुवात करण्यात आली आहे, तर वडाळा-घाटकोपर-ठाणे कासारवडवली मेट्रो-4 मार्गिकेवरही गर्डर टाकण्याचे काम सुरू करण्यात येत आहे. तसेच, दहिसर पूर्व ते अंधेरी पूर्व या मेट्रो-7 मार्गिकेच्या कामालाही वेग आला आहे. यासह या मार्गिकेवरील स्थानकांमध्ये बसवण्यात येणाऱ्या एक्सलेटरपैकी 12 एक्सलेटर नुकतेच आणण्यात आले असून, दोन लिफ्ट आणण्यात आल्या आहेत.





F 15 4x4


SCORTS F15 4x4


